तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६

दूरध्वनी २५६५६२३४ E-mail : ropune. dte @ gmail.com

जा.क्र.तंशिविकापु/आस्था-३(ब)/पदो/२०१६/ 4247 दि. 05 OCT 2017

कालमर्यादा - २०.१०.२०१७

परिपत्रक

विषय :- गट क मधील पदे पदोन्नतीने भरणेबाबत..

या कार्यालयाच्या अधिपत्याखालील शासकीय संस्थामधील **खाली नमूद केलेली पदे "ज्येष्ठता अधिन पात्रता"** विचारात घेऊन पदोन्नतीने भरावयाची आहेत. त्यासाठी सर्व संस्था प्रमुखांनी हे परिपत्रक सर्व संबंधित कर्मचा-यांच्या निदर्शनास आणून देऊन पात्र कर्मचा-यांचे अर्ज खालील रकाना क्र.४ मध्ये दर्शविलेल्या कागदपत्र/प्रमाणपत्रासह **दि.२०.१०.२०१७** पर्यंत कार्यालयास सादर करवेत. सदर पदासाठी वेतनश्रेणी व आवश्यक अर्हता खालीलप्रमाणे.

अ.क्र.	पदोन्नत पदाचे पदनाम व वेतनश्रेणी	ज्या संवर्गातून/पदामधून पद भरावयाचे आहे त्याचे पदनाम	आवश्यक अर्हता
१	२	३	४
१	सहाय्यक ग्रंथपाल रु.५२००-२०२०० ग्रे.वे.२०००	गट - क मधील पदे	१) गट क मधील पदावर तीन वर्षे सेवा पूर्ण. २) माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण. ३) महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त ग्रंथालय संघाचे लायब्ररी सायन्स मधील प्रमाणपत्र. ४) ग्रंथालयातील किमान एक वर्षाचा अनुभव आवश्यक. ५) जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्राची प्रत. (मागासवर्गीयांसाठी)
२	लोहार रु.५२००-२०२०० ग्रे.वे.२४००	गट - क / ड मधील पदे	१) संबंधित कार्यशाळेतील (shops) मधील पदावर किमान तीन वर्षे सेवा पूर्ण. २) माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण. ३) शासन मान्य आय.टी.आय. मधील संबंधित व्यवसाय परीक्षा उत्तीर्ण. ४) जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्राची प्रत (मागासवर्गीयांसाठी)
३	पंपपरिचर रु.५२००-२०२०० ग्रे.वे.१९००	गट - ड मधील पदे	१) गट ड मधील पदावर तीन वर्षे सेवा पूर्ण. २) माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण ३) शासन मान्य आय.टी.आय. मधील विजतंत्री व्यवसायातील प्रमाणपत्र परीक्षा किंवा ॲप्रेंटीस ॲक्ट खालील विजतंत्री व्यवसायातील प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण ४) जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्राची प्रत (मागासवर्गीयांसाठी)

तसेच कर्मचा-यांचे अर्ज पाठविताना त्यांची माहिती खालील विवरणपत्रात सादर करावी.

विवरणपत्र

अ.क्र.	कर्मचा-याचे नांव व पदनाम	सद्याची वेतनश्रेणी व ग्रेडवेतन	मूळ नियुक्तीचे पद व मूळ नियुक्ती दि.	प्रवर्ग	सद्याच्या पदावरील नियुक्ती दि.
१	२	३	४	५	६

संस्थेमध्ये मधील कर्मचारी उपलब्ध नसल्यास किंवा पदोन्नतीसाठी अर्ज करण्यास इच्छूक नसल्यास **'निरंक'** अहवाल सादर करण्यात यावा. पदोन्नतीने भरावयाच्या रिक्त पदांचे बिंदूनामावलीनुसार आरक्षण विचारात घेऊन पदे भरण्यात येतील.

(डॉ.दि.रा.नंदनवार)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत :- संचालक / सर्व प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये / शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, कराड / सर्व शासकीय तंत्रनिकेतने / म.रा.इन्स्टि.ऑफ हॉटेल मॅनेजमेंट ॲन्ड केटरिंग टैक्नॉलॉजी, पुणे / उपसचिव,महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ विभागीय कार्यालय, पुणे यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत:- श्री.एस.बी.शिंदे, प्रोग्रामर यांना संकेत स्थळावर प्रसिध्द करण्याकरिता.

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६

दूरध्वनी २५६५६२३४ E-mail : ropune.dte@gmail.com

जा.क्र.विकापु/आस्था-३(ब)/परिपत्रक/सेवानिवृत्ती/२०१७/4246 दिनांक : 05 OCT 2017

कालमर्यादित

परिपत्रक

विषय :- सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांची यादी

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, या विभागीय कार्यालयाच्या अधिपत्याखालील सर्व संस्था / कार्यालय प्रमुखांनी त्यांच्या संस्थेतील / कार्यालयातील **दि.३०.०९.२०१७ रोजी रिक्त असलेल्या व दि.१.०९.२०१७ ते दि.३१.०८.२०१८** या कालावधीत नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त होणा-या गट-ब(अराजपत्रीत), गट-क व गट-ड कर्मचा-यांची माहिती खाली दिलेल्या विवरणपत्रात **दि. ७.१०.२०१७** पर्यंत या कार्यालयाकडे सादर करावी.

अ.क्र.	कर्मचा-याचे नांव	पदनाम	जन्म दिनांक	नियतवयोमानानुसार सेवानिवृत्तीचा दिनांक

(डॉ.दि.रा.नंदनवार)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत : संचालक / सर्व प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये / शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय / सर्व शासकीय तंत्रनिकेतने / म.रा.इन्स्टि.ऑफ हॉटेल मॅनेजमेंट ॲन्ड केटरिंग टैक्नॉलॉजी, पुणे / उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ विभागीय कार्यालय, पुणे यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत : श्री.एस.बी.शिंदे, प्रोग्रामर यांना संकेत स्थळावर प्रसिध्द करण्याकरिता.

d/gaware/circular-2014/64